# कर्नल आर. डी. निकम सैनिक सहकारी बँक लि;

मुख्यालय : १७८/२ ब, रविवार पेठ, छ. शिवाजी महाराज सर्कल, पोवई नाका, सातारा-४१५ ००१. फोन (०२१६२) २३११५६, २३३९१३, २३९१२७.

स्थापना : १९८५ (सर्वांसाठी)

संकेतस्थळ : www.sainikbank.com


## पाहिजेत

(वर्तमानपत्रात प्रसिध्द करणेची जाहिरात)

### ज्युनिअर ऑफिसर पदाच्या भरतीसाठी जाहिरात

कर्नल आर.डी.निकम सैनिक सहकारी बँक लि., मुख्यालय सातारा सैनिकांनी सर्वांसाठी स्थापन केलेली, महाराष्ट्र राज्य कार्यक्षेत्र असलेली, आठ जिल्हयांमध्ये २१ शाखांद्वारे एकूण रूपये ५३४ कोटींचा संमिश्र व्यवसाय असणारी एक अग्रगण्य सहकारी बँक आहे. या बँकेत रिक्त असलेल्या ३० ज्युनिअर ऑफिसर पदांकरिता ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत. यासंदर्भातील अधिक तपशिलाकरिता **http://sznsbal.in** या वेबसाईटला भेट द्या. सदर परीक्षेसाठी परीक्षा शुल्क रू.१000/- व त्यावर १८% जीएसटी राहील. सदर जाहिरात प्रसिध्द झालेपासून विहीत मुदतीत इच्छूक उमेदवारांनी आपले अर्ज ऑनलाईन पध्दतीने दि.११.०८.२०२५पासून दि.३१.०८.२०२५ रोजी सायं.०५.00 वाजेपर्यंत पाठवावेत.

(टीप - नोकरीकरिता कोणतीही शिफारस, अपात्रतेसाठी कारण ठरेल.)

दि. ०८.०८.२०२५

ठिकाण - सातारा

सही/-

मुख्य कार्यकारी अधिकारी

# कर्नल आर. डी. निकम सैनिक सहकारी बँक लि;

मुख्यालय : १७८/२ ब, रविवार पेठ, छ. शिवाजी महाराज सर्कल, पोवई नाका,
सातारा-४१५ ००१. फोन (०२१६२) २३११५६, २३३९१३, २३९१२७.
स्थापना : १९८५ (सर्वांसाठी) संकेतस्थळ : www.sainikbank.com

## पाहिजेत

(वेबसाईटवर प्रसिध्द करावयाचा तपशिल)

कर्नल आर.डी.निकम सैनिक सहकारी बँक लि., मुख्यालय सातारा सैनिकांनी सर्वांसाठी स्थापन केलेली, महाराष्ट्र राज्य कार्यक्षेत्र असलेली, आठ जिल्हयांमध्ये २१ शाखांद्वारे एकूण रूपये ५३४ कोटींचा संमिश्र व्यवसाय असणारी एक अग्रगण्य सहकारी बँक आहे. या बँकेत रिक्त असलेल्या ३० ज्युनिअर ऑफिसर पदांकरिता ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. अर्ज सादर करण्याची कार्यपध्दती, भरती प्रक्रिया व मार्गदर्शन तसेच पदांकरिता आवश्यक ती शैक्षणिक पात्रता व इतर अर्हता तसेच अन्य तपशिल **http://sznsbal.in** या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

अ ) ज्युनिअर ऑफिसर - ३० पदांसाठी भरतीकरिता आवश्यक तपशील.

| अ.क्र. | तपशिल | शेरा |
|---|---|---|
| १ | उमेदवाराची शैक्षणिक पात्रता व इतर आवश्यक अर्हता | **i) आजी - माजी सैनिकांव्यतिरिक्त :**<br>१. कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी (किमान ५५% गुण आवश्यक)<br>२. संगणक साक्षर असणे आवश्यक. MSCIT / समतुल्य प्रमाणपत्र अभ्यासकम (equivalent certification course) म्हणजेच उमेदवाराकडे संगणक संचालन/संगणक भाषेचे ज्ञान यावावत डिप्लोमा/पदवी/प्रमाणपत्र/उमेदवाराने हायस्कूल/कॉलेज/मान्यताप्राप्त संस्थेत संगणक/माहिती तंत्रज्ञान हा विषय अभ्यासलेला असावा.<br>३. टंकलेखन - वेग मर्यादा किमान मराठी प्रति शब्द ३० व इंग्रजी प्रति शब्द ४०.<br>४. दुचाकी वाहन चालविता येणे आवश्यक. यासाठी अंतिम |

COL RD NIKAM SAINIK SAHAKARI BANK LTD. HQ

| | | |
|---|---|---|
| | | निवड झालेल्या उमेदवाराने वैध वाहन परवाना (Licence) रूजु होण्यापुर्वी बॅकेकडे दाखल करणे आवश्यक राहील.<br>५. मराठी, हिंदी व इग्राजी भाषांचे ज्ञान आवश्यक.<br>६. निवडीसाठी प्राधान्य क्रम.<br>अ. पदवी व्यतिरिक्त पदव्युत्तर शिक्षण, बँकींग किंवा तत्सम क्षेत्रातील कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य. उदा. बँका/पतसंस्था किंवा इतर वित्तीय संस्थांमधील कामकाजाचा अनुभव.<br>ब. JAIIB/CAIIB/GDC&A उत्तीर्ण. तसेच शासन मान्यताप्राप्त इतर संस्थेची (ICM/IIBF/VAMNICOM इ.) बँकिंग/सहकार/कायदेविषयक पदविका.<br>क. एन.सी.सी., स्काऊट, खेळ इत्यादि मध्ये प्राविण्य असल्यास प्राधान्य.<br>**ii)** आजी - माजी सैनिकांकरीता :<br>१. माजी सैनिक (Ex-serviceman)/आजी सैनिक (On duty Soldier) पात्र उमेदवारांकडूनही या पदासाठी खालीलप्रमाणे अर्ज मागविणेत येत आहेत<br>२. कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी (किमान ५०% गुण आवश्यक)/ Indian Army Special certificate of Education or the corresponding certificate in the Navy or the Air Force असणे आवश्यक राहील.<br>३. आजी सैनिक उमेदवार हा बँकेच्या संपूर्ण निवड प्रक्रियेतून पात्र होऊन प्रत्यक्ष रूजु तारखेपूर्वी निवृत्त असणे आवश्यक राहील. आजी सैनिकांनी अर्ज करण्यापूर्वी युनिटचे Commanding Officer यांची परवानगी घेणे आवश्यक राहील.<br>४. दिनांक दि.११.०८.२०२५ या तारखेपासून दि.३१.०८.२०२५ या दिवसांपर्यंतच्या कालावधीत अर्ज करण्याच्या दिवशी निवृत्त सैनिकाचा निवृत्तीनंतरचा कमाल कालावधी ३ वर्ष असणे आवश्यक राहील. यापेक्षा अधिक कालावधी होणा-या उमेदवाराचे वय ४५ वर्षाचे आत असुनही तो उमेदवार या पदासाठी अर्ज करण्यास पात्र होणार नाही.<br>५. याव्यतिरिक्त वर नमुद आवश्यक सर्व अटी लागू राहतील. |
| २ | उमेदवाराची वयोमर्यादा | **i)** आजी - माजी सैनिकांव्यतिरिक्त: किमान वय २२ वर्ष आणि कमाल वय ३५ वर्षे (दि.११.०८.२०२५ या तारखेपासून दि.३१.०८.२०२५ या दिवसांपर्यंतच्या कालावधीत अर्ज करण्याच्या दिवशी). |

| | | |
|---|---|---|
| | | ii) आजी - माजी सैनिकांकरीता : कमाल ४५ वर्षे (दि.११.०८.२०२५ या तारखेपासून दि.३१.०८.२०२५ या दिवसांपर्यंतच्या कालावधीत अर्ज करण्याच्या दिवशी). |
| ३ | ऑनलाईन परिक्षा शुल्क | रु.१000/- व त्यावरील १८% जीएसटी एकत्रितपणे उमेदवाराने ऑनलाईन पध्दतीने भरावे. |
| ४ | ऑनलाईन परीक्षेसाठीचा अभ्यासक्रम व गुण विभागणी | 1) Test of Reasoning - 18 Marks<br>2) General English - 18 Marks<br>3) Numerical Ability & Quantitative Aptitude - 18 Marks<br>4) Computer Awareness -- 18 Marks<br>5) General Awareness (with special reference to Banking & Economics) - 18 Marks<br>Total Marks - 90 (18 Marks for each topic.) |
| ५ | परीक्षेचे स्वरूप व निवड पध्दती | १. परीक्षेचा कालावधी ९0 मिनिटांचा राहील.<br>२. परीक्षा बहुपर्यायी स्वरूपाची असेल.<br>३. परीक्षा ९0 गुणांची राहील.<br>४. तोंडी मुलाखत १0 गुणांची राहील.<br>५. परीक्षेचे माध्यम मराठी व इंग्रजी राहील.<br>६. लेखी परीक्षेतुन मुलाखतीस पात्र (Short Listed) उमेदवारांची सातारा येथे तोंडी मुलाखत घेणेत येईल.<br>७. उमेदवारांची निवड केवळ गुणवत्तेवरच असेल व त्यानुसार प्रतिक्षा यादी तयार करून आवश्यकतेनुसार भरती केली जाईल.<br>८. अंतिम निवड यादी (प्रतिक्षा यादी सह) वेवसाईट वर प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासुन ३६५ दिवस वैध राहील.<br>९.अंतिम निवड होणाऱ्या उमेदवारांनी मा.जिल्हा शल्य चिकित्सक यांचा वैद्यकीय पात्रता अहवाल व मा.जिल्हा पोलीस अधिक्षक यांचा चारिज्य पडताळणी अहवाल सादर करणे आवश्यक राहील. |
| ६ | ऑनलाईन अर्ज भरण्याचा कालावधी | दि. ११.0८.२0२५ या तारखेपासून दि.३१.0८.२0२५ पर्यंत सायं.५.00 वाजेपर्यंत. |
| ७ | परीक्षा पध्दती | ऑनलाईन |
| ८ | परीक्षा ठिकाण | सातारा |
| ९ | ऑनलाइन अर्ज सादर करण्यासाठी आणि ऑनलाईन परीक्षा शुल्क भरण्यासाठी वाजुच्या वेवसाईटवर ऑनलाईन अर्ज सादर करण्याची पध्दत, ऑनलाईन परीक्षेवावत इतर माहिती व | **http://sznsbal.in** |

COL. ND NIKAM SAINIK SAHAKARI BANK LTD. HQ

| | | |
|---|---|---|
| | नांव नोंदणी वगैरे सर्व तपशिल उपलब्ध आहे. | |
| १० | ज्युनिअर ऑफिसर पदाच्या भरतीबावत अटीं व शर्ती अथवा इतर कोणतेही बदल करणेचे अधिकार बँकेच्या मा. बँक व्यवस्थापन यांना राहतील याची नोंद घ्यावी. | |

तरी इच्छूक उमेदवारांनी **http://sznsbal.in** या वेवसाईटवर विहीत वेळेत परीक्षा शुल्क भरुन अर्ज सादर करावेत.

उपरोक्त पदासाठी वर नमुद वेबसाईटद्वारे ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करावयाचे आहेत. अन्य कोणत्याही पध्दतीने प्राप्त झालेल्या अर्जाचा आणि फी चा विचार केला जाणार नाही याचीही नोंद घ्यावी.

## ब ) ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याची प्रक्रिया :

१. अर्ज करण्याची पध्दत: ऑनलाईन अर्ज सादर करण्यावावत सविस्तर सुचना **http://sznsbal.in** या संकेतस्थळावर उपलव्ध आहेत. उमेदवार त्याचा अर्ज इंटरनेट सुविधा असलेल्या ठिकाणी भरू शकेल.

२. **http://sznsbal.in** या संकेतस्थळावर रजिस्ट्रेशन करावे.

३. उमेदवाराने इच्छूक पदाकरिता रू. १000/- व त्यावरील १८% जीएसटी एकत्रितपणे ऑनलाईन पध्दतीने भरावे. परीक्षाशुल्क फक्त ऑनलाईन पेमेंट माध्यामातूनच भरावे लागेल, परीक्षा शुल्क भरणे अनिवार्य आहे न भरल्यास उमेदवारास अपात्र करण्यात येईल. ऑनलाईन पेमेंट अपडेट होण्याकरिता २४ तास ते ४८ तास लागू शकतात. उमेदवाराचे पेमेट झाल्यानंतर त्यांनी आपल्या अर्जाची प्रत आपल्याकडे सांभाळून ठेवावी.

४. अर्ज भरण्यापूर्वी उमेदवाराने खालील तपशीलाप्रमाणे नजीकच्या काळातील फोटो व स्वाक्षरी इमेज soft कॉपी स्वत:कडे तयार ठेवावी.

| तपशील | Size Limit | Details |
|---|---|---|
| अर्जदाराचे अलीकडील पासपोर्ट छायाचित्र | JPEG Format मधील २० केबी पर्यत | लांबी x रूंदी प्रमाणे (Proportion ) 3.5 CM *4.5 CM असावे. छायाचित्र समोर चेह-याचे असावे. छायाचित्राचा ७५% भाग चेहरा असावा. |
| अर्जदाराची स्वाक्षरी | JPEG Format मधील २० केबी पर्यत | को-या पांढ-या कागदावर गडद जाड पॉईन्ट पेनाने स्वाक्षरी करावी 2.5 CM *1.5 CM असावे |

५. उमेदवाराचा फोटो व सही ऑनलाईन अर्ज भरताना upload करणे आवश्यक आहे. या व्यतिरिक्त इतर कागदपत्रे upload करण्याची गरज नाही. अर्जातील सर्व आवश्यक माहिती भरणे बंधनकारक आहे.

६. अर्जदाराने upload केलेले image सुस्पष्ट नसल्यास त्यास अपात्र ठरविले जाऊ शकते याची नोंद घ्यावी.

७. सदर पेजवरील सर्व माहिती भरल्यानंतर व छायाचित्र आणि स्वाक्षरी अपलोड केल्यानंतर submit यांवर click करावे.

८. अर्जात भरलेली माहिती परिपूर्ण असल्यास येणा-या मेसेज बॉक्समध्ये भरती प्रक्रियेतील पुढील बाबींची (उदा. अर्जाची पात्रता पाहणे, प्रवेश पत्र काढणे, जन्म तारीख वगैरे) माहिती अचूक असल्याची खात्री करावी.

९. अर्जात भरलेली माहिती परिपूर्ण असल्याची खात्री असल्यास अथवा चुकीची माहिती दुरूस्त करून अचूक भरल्यानंतर save & continue यावर क्लिक करावे. त्यानंतर अर्जाचा id, ऑनलाईन परिक्षा फी भरण्याची अथवा विहीत केलेले परिक्षा शुल्क जमा करण्याची अंतिम तारीख याबाबतची माहिती उमेदवारास दिसेल.

१०. तयार झालेला Form चा Id भरतीच्या संपूर्ण प्रक्रियेत उपयुक्त असल्याने तो उमेदवाराने सांभाळून /जतन/नोंद करून ठेवावा. यानंतर अर्जात भरलेली माहिती उमेदवाराला बदलता येणार नाही.

११. उमेदवाराने अर्जात नमुद केलेली सर्व माहिती व तपशील अचूक असून कोणतीही माहिती अथवा तपशील चुकीचा, खोटा अथवा दिशाभुल करणारा आढळल्यास अर्ज कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल याची नोंद घ्यावी. तशी घोषणा (Declaration) मान्य करून submit my form यावर click करावे. त्यानंतर अर्ज सादर होईल.

१२. त्यानंतरच्या page वर Form चा Id व Mobile number ही माहिती भरून प्रिंट रिसीट यावर क्लिक करावे. त्यानंतर उमेदवाराच्या अर्जाची पोच पावती उपलब्ध होईल.

१३. Email प्राप्त झाल्यावर उमेदवार Form ची पोच पावती काढून घेऊ शकतो.

१४. ऑनलाईन परीक्षा उमेदवाराचे कोणतेही कागदपत्र तपासणी न करता घेतली जाणार असल्याने नंतर कागदपत्रांमध्ये त्रुटी आढळल्यास केवळ ऑनलाईन परीक्षेस बसू दिल्यामुळे/मुलाखतीस पाचारण केल्यामुळे उमेदवाराला निवडीबाबत कोणताही हक्क सांगता येणार नाही.

१५. अर्ज एकदा ऑनलाईन सादर केल्यानंतर त्यामध्ये कोणतेही बदल करता येणार नाही याची नोंद घ्यावी.

१६. परीक्षा प्रवेश पत्र उमेदवारास संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल. सदर पत्र पोस्टाने पाठवले जाणार नाही. परिक्षेच्या वेळी उमेदवारांनी प्रवेश पत्र आणणे अनिवार्य आहे. उमेदवाराने प्रवेश पत्राशिवाय स्वत:चे छायाचित्र असलेले ओळखपत्र जवळ बाळगणे आवश्यक राहील. उदा. आधार कार्ड/पॅन कार्ड /निवडणूक ओळखपत्र. सदर ओळखपत्राची स्वसाक्षांकित केलेली छायांकित प्रत पडताळणीसाठी परीक्षेच्या वेळी प्रवेश पत्रावरोवर सादर करावी.

१७. परीक्षा शुल्क: प्रस्तुत भरती प्रक्रियेसाठी खालीलप्रमाणे परीक्षा शुल्क राहील.

| परीक्षा शुल्क रू. १000/- व त्यावरील १८% जीएसटी. |
|---|

वरील प्रमाणे परीक्षा शुल्क रू. १000/- व त्यावरील १८% जीएसटी हे ना परतावा राहतील याची नोंद घ्यावी.

१८. सदरची परिक्षा ऑनलाईन पध्दतीने असलेने उमेदवारांनी संकेत स्थळावर वेळोवेळी प्रसिध्द होणा-या सुचनांची नोंद घेण्यासाठी वारंवार **http://sznsbal.in** या वेबसाईटला भेट देणे आवश्यक आहे.

१९. सदर कर्मचारी भरती ही अंतिम निवड करण्यात आलेल्या उमेदवारांमधून बँकेच्या आवश्यकतेनुसार करण्यात येईल. त्याच प्रमाणे बँकेच्या सेवेत अंतिम निवड करण्यात आलेल्या उमेदवारांना बँकेच्या प्रचलित असलेल्या 'कर्मचारी भरती धोरणातील अटीं व शर्ती (उदा. प्रोबेशन कालावधीतील रजा, वेतन इ.) त्याच प्रमाणे शासनाचे निर्देश लागू राहतील. तसेच परिक्षेचे स्वरूप व निवड पध्दतीमध्ये नमुद केलेले मुद्दे लागू राहतील.

COL. RD NIKAM SAINIK SAHAKARI BANK LTD. HQ

२०. ऑनलाईन अर्ज सादर करण्याबाबत सविस्तर सुचना sainikbank.com या संकेतस्थळावर ही माहीतीस्तव उपलब्ध आहेत.

२१. नोकरभरती विषयक सर्वाधिकार बँक व्यवस्थापन राखून ठेवत असून भरती प्रक्रिया संपूर्ण किंवा अंशत: रद्द करण्याचे अधिकार देखील बँक राखून ठेवत आहे.

(टीप - नोकरीकरिता कोणतीही शिफारस, अपात्रतेसाठी कारण ठरेल.)

दि. ०८.०८.२०२५
ठिकाण - सातारा

COL. RD NIKAM SAINIK SAHAKARI BANK LTD. HQ

सही/-
मुख्य कार्यकारी अधिकारी